Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date 16 December 2024

Time 11.00 to 11.05 AM

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक: १६ डिसेंबर २०२४ सकाळी ११.०० वाजता.**

****

प्रख्यात तबलावादक उस्ताद जाकीर हुसैन यांचं अमेरिकेत निधन झालं, ते ७३ वर्षांचे होते. हृदयविकाराशी संबंधित त्रासामुळे त्यांना सॅनफ्रान्सिस्को इथल्या रुग्णालयात दाखल करण्यात आलं होतं, उपचारादरम्यान रात्री उशीरा त्यांचं निधन झालं. त्यांच्या कलाजीवनाचा वेध घेणारा हा संक्षिप्त वृत्तांत...

***"नऊ मार्च १९५१ रोजी मुंबईत जन्मलेले जाकीर हुसैन यांनी त्यांचे वडील उस्ताद अल्लारखां यांच्याकडून तबला वादनाचे धडे घेतले आणि वयाच्या बाराव्या वर्षापासून ते कालपर्यंतच्या आपल्या सहा दशकांच्या कारकिर्दीत तबला वादनाला नवी ओळख मिळवून दिली. जगभरात विविध कलावंतांसोबतचं त्यांचं जुगलबंदी सादरीकरण हा रसिकांसाठी अद्भुत अनुभव ठरत असे. विविध चित्रपट आणि जाहिरातपटातून भूमिका केलेले जाकीर हुसैन यांना १९८८ साली भारत सरकारने पद्मश्री सन्मान प्रदान केला, हा सन्मान मिळालेले ते सर्वात तरुण व्यक्ती ठरले. त्यानंतर पद्मभुषण आणि पद्मविभुषण सन्मानाने त्यांचा गौरव करण्यात आला. संगीत क्षेत्रात आंतराष्ट्रीय पातळीवर मानाच्या ग्रॅमी पुरस्कारांवर त्यांनी पाच वेळा नाव कोरलं, यापैकी तीन पुरस्कार त्यांना याच वर्षी मिळाले होते. तबल्यावर थिरकणारी त्यांची जादुई बोटं आणि त्यातून उमटणारा अलौलिक तालध्वनि.. रसिकांच्या मनावर सदैव अधिराज्य करत राहतील.."***

****

विजय दिवस आज साजरा होत आहे. १९७१ साली झालेल्या भारत पाक युद्धात भारतानं आजच्या दिवशी पाकिस्तावर विजय मिळवत ९३ हजाराहून अधिक पाकिस्तानी सैनिकांना युद्धबंदी केलं होतं. त्यानंतर पाकिस्ताननं बिनशर्त शरणागती

पत्करली, दुसऱ्या महायुद्धानंतरची ही सर्वात मोठी शरणागती ठरली. यानंतर पूर्व पाकिस्तान वेगळा होऊन बांग्लादेशची निर्मिती झाली.

या विजयाची आठवण म्हणून आज देशभरात सैन्यदलाच्या छावण्यांसह विविध ठिकाणी अनेक कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू तसंच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या युद्धात शौर्य गाजवलेल्या सैनिकांचं सामाजिक माध्यमावरुन स्मरण करत, हुतात्मा सैनिकांना अभिवादन केलं आहे.

****

एक राष्ट्र एक निवडणूक या विषयी दोन विधेयकं आज लोकसभेत सादर करण्यात येणार आहेत. कायदा मंत्री अर्जुन राम मेघवाल संविधान विधेयक आणि केंद्रशासित प्रदेश कायदा विधेयक सादर करतील. राज्यसभेत आज संविधानावर विशेष चर्चा सुरु होणार आहे. भाजपनं आपल्या खासदारांना व्हिप जारी करुन आज आणि उद्या सभागृहात हजर राहण्याचे आदेश दिले आहेत.

****

राज्य विधीमंडळाचं हिवाळी अधिवेशन आजपासून नागपूर इथं सुरु होत आहे. या अधिवेशनात २० विधेयकांवर सदनात चर्चा होईल, यापैकी १४ अध्यादेश सभागृहाच्या पटलावर ठेवून त्यांचं विधेयकात रुपांतर करण्यात येणार आहे. तर सहा नवीन विधेयकं मांडण्यात येणार आहेत.

****

राज्य सरकारनं हमीभावानं सोयाबीन खरेदी करण्याचा निर्णय घेतला आहे. राज्यात १४ डिसेंबरपर्यंत ५५१ खरेदी केंद्रांवर, केवळ एक लाख ३१ हजार टन सोयाबीनची खरेदी झाल्यानं, शेतकऱ्यांना नोंदणीसाठी १५ डिसेंबरवरून ३१ डिसेंबरपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. राज्य सरकारनं चार हजार ८९२ रुपये प्रतिक्विंटल हमीभावानं सोयाबीन खरेदी करण्याचे निर्देश नाफेड आणि राष्ट्रीय ग्राहक संघटना या दोन संस्थांना दिले आहेत. ही खरेदी ६७ हजार ७५३ शेतकऱ्यांकडून करण्यात आली. राज्यात यासाठी ५८१ केंद्रांना खरेदीची परवानगी देण्यात आली असून, त्यातले ५५१ केंद्रं सुरू असल्याची माहिती सहकार आणि पणन विभागानं दिली आहे.

****

गडचिरोली जिल्ह्यात नक्षलवाद्यांनी पोलिसांचा घातपात करण्याच्या हेतूने जंगलात पुरुन ठेवलेली स्फोटकं शोधून काढण्यात पोलिसांना यश आलं. अहेरी तालुक्यातल्या मरपल्ली पोलिस मदत केंद्रांतर्गत, करंचा गावानजीकच्या जंगलातून ही

स्फोटकं शिताफीने बाहेर काढून ती नष्ट करण्यात आली. मरपल्ली पोलिस मदत केंद्रातील पोलिस आणि राज्य राखीव दलाच्या जवानांनी ही शोध मोहीम राबवली.

****

महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरणाच्या निर्देशावरून काल बीड इथं पार पडलेल्या लोक न्यायालयात, बीड जिल्ह्यातली एकंदर २ हजार ३९३ प्रकरणं तडजोडीनं निकाली काढण्यात आली. संपूर्ण बीड जिल्ह्यातून ११ हजार ४२ प्रलंबित प्रकरणं लोक अदालतीत ठेवण्यात आली होती.

सोलापूर इथं झालेल्या लोकअदालतीत जिल्ह्यातल्या एकूण १९ हजार ८३१ प्रकरणे सामंजस्यानं निकाली काढण्यात आली.

****

भारतीय महिला हॉकी संघाने आशियाई कनिष्ठ हॉकी स्पर्धेचं अजिंक्यपद पटकावलं आहे. अंतिम फेरीत भारताने चीनचा पेनल्टी शूट आऊट मध्ये तीन – दोन असा पराभव केला.

****

परभणी जिल्ह्यात आज ही थंडीचा जोर कायम असून, सकाळी चार पूर्णांक एक अंश सेल्सिअस या निचांकी तापमानाची नोंद झाली. थंडी पासून संरक्षण करण्यासाठी नागरीक उबदार कपड्यांचा वापर करत असून, शेकोट्यांचा आधार घेत आहेत.

****